**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३७/२०१८-१९/ 256 दिनांक: 26 NOV 2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ३७(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | मे. दिवाण बिल्डर्स , सरगम विहार<br>अपार्टमेंटस बि विंग ताराबाई पार्क कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर | |
| ३) | अतिरिक्त कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि.कं.मर्या. उत्तर उपविभाग कोल्हापूर | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२. श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार तक्रारदारानी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय कोल्हापूर यांच्या दिनांक १८.०६.२०१८ च्या आदेशाने व्यथीत होऊन, दाखल केलेली आहे.

12/11/2018

तक्रारदाराची थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदाराचे नावे वर नमूद पत्यावर सन-१९९५ मध्ये बांधकामासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी विद्युत मीटर करता ८ अश्वशक्ती चे विद्युत कनेक्शन घेण्यात आलेले होते व आहे. सध्या त्याचा वापर पिण्याचे पाणी बोअर पंपाद्वारे टाकीमध्ये टाकण्यासाठी केलेला जात असून सदर कनेक्शन घेतल्यापासून औद्योगिक दराने बिलींग केले जात होते. त्यानुसार तक्रारदाराने सर्व बिले भरलेली आहेत. तथापि माहे मार्च-२०१८ मध्ये वि. पं. कंपनीच्या भरारी पथकाने केलेल्या निरीक्षणाप्रमाणे सदर विजेचा वापर घरगुती वापराकरिता असल्याचे दर्शवून माहे जून-२०१५ ते फेब्रुवारी-२०१८ पर्यन्त सदर विज कनेक्शनचा वापर घरगुती असल्याचे दर्शवून त्या कालावधीतील विज दरातील फरकाची रक्कम रु. १,१०,५५०/- आकारलेले दर्शवून सदर विज देयक फरकाचे बिल तक्रारदारास देण्यात येऊन सदरच्या रक्कमेची मागणी करण्यात आलेली आहे. तक्रारदाराच्या कथनानुसार सदर बिलातील फरक जून-२०१५ पासून कोणत्या परिपत्रकानुसार आकारलेला आहे ते नमूद केलेले नाही. सदर फरकाची रक्कम अन्याय कारकरित्या आकारलेली असून ती विद्युत कायदा २००३ ला अनुसरुन नाही. सबब सदर फरकाची रक्कम रद्द करण्यात यावी व येथून पुढील विज देयके घरगुती दरानुसार आकारण्यात यावी या मागणी करता त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली असता, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आपल्या दिनांक २८.०६.२०१८ च्या आदेशाने सदरची तक्रार फेटाळून लावलेली आहे. सबब तक्रारदारांना प्रस्तुत तक्रार या मंचासमोर दाखल करणे भाग पडलेले आहे. अशा कथनावरुन तक्रारदाराने भरारी पथकाच्या निरीक्षणाप्रमाणे विज देयक माहे जून २०१५ ते फेब्रुवारी-२०१८ पर्यन्त केलेली रक्कम रु. १,१०,५५०/- इतक्या फरकाची रक्कम रद्द करुन मिळावी अशी मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर वीज वितरण कंपनीने अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. उत्तर उपविभाग, कोल्हापूर यांच्या मार्फत हजर होऊन आपले म्हणणे खालील प्रमाणे मांडले.

मे. दिवाण बिल्डर्स , नागाळा पार्क, कोल्हापूर विज ग्राहक क्रमांक २६६५११७६१२०४ सदर ग्राहकाचा विज देयक औद्योगिक वर्गवारीनुसार होत आले आहे तथापी भरारी पथकाने स्थळ तपासनी केली असता ग्राहकाचा विज वापर घरगुती असल्याचे निर्दशनास आले आहे. तसा अहवाल अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक, कोल्हापूर यांचे पत्र क्र. Add.EE/FS/Kop/No.84 Date 26.02.2018 नुसार कळविण्यात आला आहे. त्यानुसार औद्योगिक ते घरगुती वापराची जून-२०१५ ते फेब्रुवारी-२०१८ पर्यन्तची रिकव्हरी रक्कम रुपये १,१०,५५०/- सदर ग्राहकास संदर्भ क्र. ४ नुसार कळविण्यात आली आहे.

सदर ग्राहकास व्यावसायिक परीपत्रक क्र. 243 (PR-3Tariff/27641 Dt. 03.07.2015 ) व अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक, कोल्हापूर यांचे पत्र क्र. Add.EE/FS/Kop/No.84 Date 26.02.2018 नुसार मधील कालावधीनुसार रिकव्हरी देयक ग्राहकास देण्यात आले. ग्राहकाने मा. अध्यक्ष अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे रिकव्हरीबाबत तक्रार केली असता अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा आदेश क्र. अअ/कोमं/तांत्रिक/उपकाअ-५/५९९५ दिनांक २८.०६.२०१८ नुसार ग्राहकाची फरकाची रक्कम रद्द करणेची मागणी फेटाळण्यात आली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज रोजी या मंचासमोर घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारातर्फे श्री रमेश बिद्री व श्री एस.पी. कुलकर्णी, व वि.प. कंपनीतर्फे श्री मांडके , अतिरिक्त कार्यकारी अभियंता उपविभाग उत्तर, कोल्हापूर हे हजर होते . त्याचे युक्तीवाद ऐकून घेण्यात आला.

आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

**मुद्दा क्र.१ :-** वीज देयक दिनांक ०१.०३.२०१८ मधील जून २०१५ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीतील पुर्वलक्षी प्रभावाने केलेले विज बिल दरातील फरकाची मागणी ही योग्य व कायदेशीर आहे काय?

**उत्तर:-** नाही

**मुद्दा क्र.२ :-** अंतिम आदेश?

**उत्तर:-** खालील प्रमाणे

**कारणे**

**मुद्दा क्र.१ व २ :-** प्रस्तुत प्रकरणातील सर्व तथ्ये (Facts) या उभपक्षी मान्य आहेत. विस्तार भयापोटी त्याचा पुर्नविचार आम्ही टाळीत आहोत. प्रस्तुत प्रकरणात वीज दर आकारणी च्या वर्गवारीबाबत तक्रारदाराचा काही उजर असल्याचे दिसत नाही. सुरुवातीला सदरचे विज कनेक्शन हे बांधकामाकरता व पिण्याच्या पाण्याच्या सोयीकरता घेण्यात आलेले होते, व त्याची आकारणी औद्योगिक दराने होत होती. ही बाब तक्रारदारानी मान्य केलेली आहे. तसेच कालांतराने सदर वीज जोडणी उपयोग घरगुती वापराकरता करण्यात येऊ लागलेला आहे. ही बाब देखील तक्रारदारानी मान्य केलेली आहे. मार्च-२०१८ पासून पुढील सर्व विज बिले घरगुती विज बिल आकारणी प्रमाणे देण्यात येत असून त्या दराने तक्रारदार सदरची बिले भरत आहेत, व येथून पुढे सर्व बिले त्या दर आकारणी नुसार ते भरण्यास तयार आहेत. असे तक्रारदारानी या मंचाच्या समोर निवेदन केलेले आहे यांचा अर्थ असा की घरगुती विज दर आकारणी प्रमाणे बिलाची आकारणी करण्यास तक्रारदाराचा कोणताही आक्षेप नाही. तथापी त्यांचा आक्षेप सदर विज बिल दर आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने जून-२०१५ पासून करण्याबाबत त्यांचा आक्षेप आहे. वि. प. कंपनी तर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, वाणिज्य परिपत्रक क्र.२४३ दिनांक ०३.०७.२०१५ नुसार दर आकारणीतील बदल करण्यात आले व ते ०१ जून-२०१५ या तारखेपासून लागू करण्यात आले व त्या तारखेपासून तक्रारदाराच्या विद्युत जोडणीला घरगुती विज देयक आकारणी लागू झाली आणि त्या तारखेपासून घरगुती विज बिल दरानुसार आकारणी करणे आवश्यक असताना माहे फेब्रुवारी-२०१८ पर्यन्त त्या दराने विज आकारणी करण्यात आलेली नव्हती, व सदरची बाब भरारी पथकाने केलेल्या माहे फेब्रुवारी-२०१८ मधील निरीक्षणात आढळून आल्यामुळे व त्याबद्दलचा अहवाल भरारी पथकाकडून प्राप्त झाल्याने सदर दर बदलातील फरकाची रक्कम तक्रारदाराकडून मागण्यात आलेली असून ती योग्य व रास्त आहे. सबब तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

विज वितरण कंपनी तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद हा वैध नाही असे या मंचाचे स्पष्ट मत आहे विज नियमाक आयोगाने केस क्र. २४(२००१) मधील दिनांक ११.०२.२००२ च्या आपल्या आदेशात खालील प्रमाणे निष्कर्ष नोदविलेले आहेत.

"No retrospective recovery of arrears can be allowed on the basis of any abrupt reclassification of consumer even though the same might have been pointed out by the Auditor. Any reclassification must follow a definite process of natural justice and the recovery, if any would be prospective only as the earlier classification was done with a distinct application of mind by the competent people . The same cannot be categorized as an escaped billing in the strict sense of the term to be recovered retrospectively."

वीज नियमाक आयोगाचा वरील निष्कर्ष या मंचावर बंधनकारक आहे. त्यानुसार वीज दर संकेतांकातील किंवा वर्गवारीला पुर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नसून त्या कारणावरुन अचानकरित्या पूर्वीच्या कालावधीतील दर बदल किवा वर्गवारी मुळे निर्माण झालेली थकबाकी मागता येत नाही व ती अयोग्य आहे. विज नियामक आयोगाचा सदर निकाल प्रस्तुत प्रकरणात सर्वतोपरी लागू पडतो. त्यामुळे माहे जून-२०१५ ते फेब्रुवारी-२०१८ या कालावधतील वीज दर बदलातील रक्कम रु. १,१०,५५०/- ची मागणी ही बेकायदेशीर आहे असे या मंचाचे स्पष्ट मत आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारदाराची तक्रार फेटाळून लावताना कोणतेही कारण आपल्या आदेशात नमूद केले नाही. त्यामुळे देखील सदरचा निकाल योग्य आहे असे म्हणता येत नाही.

त्यानुसार दि. २८.०२.२०१८ च्या पुरवणी देयका मधील मागील कालावधीकरता केलेली कथीत थकबाकीची मागणी कायदेशीर असल्याचे म्हणता येत नाही. हया कारणाकरिता तक्रारदाराची तक्रार अमान्य करता येत नव्हती व ती तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने अयोग्यरित्या काही कारण न देता खारीज केलेली आहे. असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. दिनांक २८.०२.२०१८ च्या पुरवणी बिलातील मागील थकबाकीची रक्कम सर्वस्वी अयोग्य व बेकायदेशीर आहे व ती रद्द करावी लागेल असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्रमांक एक उत्तर आम्ही होकारार्थी दिलेले आहे.

सबब आम्ही खालील आदेश पारित करत आहोत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) भरारी पथकाच्या निरक्षणाप्रमाणे माहे जून-२०१५ ते फेब्रुवारी-२०१८ पर्यन्त कालावधीची रक्कम रु. १,१०,५५०/- रक्कमेची मागणी करणारे दिनांक ०१.०३.२०१८ बिल या आदेशाने रद्द करण्यात येत आहे.

३) सदर फरकाची मागणी रद्द करण्यात आलेली असून,त्यातील रक्कमेची वसुली तक्रारदाराकडून करु नये. असा आदेश विज वितरण कंपनीला देण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| ( पी.एस. पुजारी) | (श्री. एन.बी. बारसिंग) | (ए.व्ही. देशपांडे) |
|---|---|---|
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण